आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१७ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताची वाटचाल ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या प्रगतीचीही वाटचाल ठरणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- नॅशनल ब्रॉडबँड मिशनच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात, फोनवरुन होणारी फसवणूक टाळण्यासाठी संचार साथी ॲपचे अनावरण

- स्थानिक केबलचालकांना ऑनलाइन नोंदणीची सुविधा देण्यासाठी नियमांमधे दुरुस्ती

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली

- रशियन लष्करात कार्यरत असलेले १२ भारतीय नागरीक युद्धात ठार, १६ जण बेपत्ता असल्याची भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

**आणि**

- राष्ट्रीय क्रीडा आणि साहसी पुरस्कारांचे राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण

**<><><><><>**

विकसित भारताची वाटचाल ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या प्रगतीचीही वाटचाल ठरणार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारत ग्लोबल मोबिलिटी एक्स्पोच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. गेल्या वर्षी भारताचं वाहन क्षेत्र जवळपास १२ टक्क्यानं वाढलं आहे. मेक इन इंडिया अंतर्गत तयार होणाऱ्या गाड्यांची निर्यातही वाढली आहे, असं मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

गुंतवणूक आणि निर्यात या दोन्हींमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला.

हा एक्स्पो सहा दिवस चालणार असून येत्या २२ तारखेला त्याचा समारोप होईल.

**<><><><><>**

अन्न पदार्थांच्या किंमती स्थिर राखण्यासाठी आणि ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत ते उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा डाळी आणि कांद्याचं उत्पादन वाढेल, असा अंदाजही ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने वर्तवला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय इस्पात निगम या सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपनीच्या पुनरुज्जीवनासाठी ११ हजार ४४० कोटी रुपयांचं पॅकेज केंद्रसरकारने मंजूर केलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. आंध्रप्रदेशातल्या या महत्त्वाच्या पोलाद प्रकल्पाचं पुनरुज्जीवन झाल्यावर त्याचा फायदा मोठ्या लोकसंख्येला होणार आहे.

**<><><><><>**

फोनकॉलच्या माध्यमातून होणारी फसवणूक तसंच मोबाईलचा गैरवापर यांना आळा घालण्यासाठी संचार साथी नावाच्या नवीन ॲपच अनावरण आज केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केलं. ग्रामीण भागातल्या जास्तीत जास्त कुटुंबाना इंटरनेट सुविधा मिळावी या उद्देशाने सुरू झालेल्या नॅशनल ब्रॉडबँड मिशनच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवातही त्यांनी केली. डिजिटल भारत निधीच्या अंतर्गत उभारलेल्या सुमारे २८ हजार मोबाइल टॉवरच्या सुविधेचा उपयोग आता

कोणत्याही मोबाइल कंपनीला करता येईल. त्यामुळे ग्राहकांसाठी नेटवर्कची उपलब्धता सुधारेल. संचार साथी या नवीन ॲप्लिकेशनविषयी ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाईस कास्ट**

*फोन, मेसेज किंवा ॲपच्या माध्यमातून होणाऱ्या सायबर फसवणुकीची तक्रार करता यावी, आपल्या नावाने काढलेली खोटी फोन कनेक्शन्स ओळखता यावीत, अशा विविध तक्रारी संचार साथी या एकाच ॲप्लिकेशनच्या माध्यमातून सोडवता येणार आहेत. यात फोनवरून होणाऱ्या सायबर फसवणुकीची तक्रार नोंदवण्यासाठी चक्षु नावाचा पर्याय देण्यात आला आहे. त्यात नोंदणी करताना संबंधित फोन क्रमांक किंवा मेसेजचे तपशील भरल्यानंतर ही तक्रार नोंदवली जाईल. त्या खेरीज हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन शोधून तो ब्लॉक करणं, आपल्या नावे दाखल असलेली खोटी फोन कनेक्शन शोधणं तसंच संशयित आंतरराष्ट्रीय कॉलची तक्रार करण्यासाठी पर्याय देण्यात आले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी रश्मी पाटकर, मुंबई*

**<><><><><>**

स्थानिक केबलचालकांची नोंदणी सुलभ करण्यासाठी १९९४ मधल्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियमांमधे दुरुस्ती करणारी अधिसूचना आज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केली. त्यानुसार आता ही नोंदणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीनं होईल आणि अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर प्रत्यक्ष परवाने देण्यात येतील. देशात सर्वत्र त्याची मुदत ५ वर्ष करण्यात आली आहे. नूतनीकरण शुल्क आता ५ हजार रुपये करण्यात आलं असून नूतनीकरणासाठीची मुदत परवाना संपण्यापूर्वी किमान ९० दिवस पर्यंत ठेवली आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी आजवर एक हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवारपर्यंत आहे. ५ फेब्रुवारीला मतदान तर ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आज भाजपच्या शिखा राय आणि निरज बसोया तर आम आदमी पार्टीचे अवध ओझा, राखी बिदलान आणि बंदना कुमारी यांनीही आपले अर्ज दाखल केले.

**<><><><><>**

रशियाच्या लष्करात कार्यरत असलेले १२ भारतीय वंशाच्या नागरीक युद्धात ठार झालेत तर १६ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैयस्वाल यांनी दिली. रशियाच्या लष्करात कार्यरत असलेल्या ९६ भारतीय वंशाच्या नागरिकांना सेवेतून मुक्त केलं असून ते मायदेशी परतले आहेत.

बांगलादेशाबरोबर भारताला सौहार्दपूर्ण संबंध हवे असल्याचं जैयस्वाल यांनी सांगितलं.  अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी कार्यक्रमाला भारताकडून परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असा अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. जागतिक अर्थव्यवस्थांबद्दलचा जागतिक बँकेचा अहवाल काल प्रसिद्ध झाला, त्यात म्हटलंय की चालू आर्थिक वर्षातला वाढीचा दर साडेसहा टक्के राहण्याची शक्यता आहे. गेल्या आर्थिक वर्षात हा दर ८ पूर्णांक २ दशांश टक्के होता. आगामी वर्षात सेवा

क्षेत्रात सातत्यपूर्ण वाढ दिसेल, तर सरकारी पाठबळाच्या आधारावर उद्योगक्षेत्र ६ पूर्णांक ७ दशांश टक्के दराने वाढेल, असं या अहवालात नमूद केलं आहे.

<><><><><>

भारतीय वंशाचे कॅनडातले संसद सदस्य, चंद्र आर्य यांनी आपण कॅनडाच्या प्रधानमंत्री पदाच्या शर्यतीत उतरल्याची अधिकृत घोषणा केली आहे. कर्नाटकातल्या तुम कुर जिल्ह्याचे मुळ रहिवासी असलेले आर्य, हे कॅनडातल्या नेपीयन विभागातून संसद सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

<><><><><>

चीनच्या जिउ कुआन उपग्रह प्रक्षेपण केंद्रातून पाकिस्तानचा उपग्रह अवकाशात यशस्वीरित्या सोडण्यात आला. हा उपग्रह त्याच्या निर्धारीत कक्षेत स्थिरावला आहे.

<><><><><>

पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांना अल-कादिर विद्यापीठ ट्रस्ट प्रकरणी १४ वर्षांच्या तुरुंगवासाची आणि त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना ७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तुरुंगात उभारलेल्या तात्पुरत्या न्यायालयाच्या न्यायाधीशांनी ही शिक्षा सुनावली. तुरुंगवासाच्या शिक्षेसोबतच इम्रान खान यांना १० लाख पाकिस्तानी रुपये आणि त्यांच्या पत्नीला ५ लाख पाकिस्तानी रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

<><><><><>

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा आणि शौर्य पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात देशातला सर्वोच्च क्रीडा सन्मान मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार बुद्धिबळाचा जगज्जेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार

हरमनप्रीत सिंग, पॅरा अथलीट प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर या चौघांना प्रदान करण्यात आला. ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

क्रीडाप्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांच्यासह ५ जणांना प्रदान करण्यात आला. राज्यातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं. ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला.

ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना तेनझिंग नोर्गो राष्ट्रीय साहसी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><><>

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज झालेल्या महिलांच्या एकेरी उपांत्यपूर्व फेरीत पी व्ही सिंधू हिचा इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंग हिनं ९-२१,२१-१९,१७-२१ असा पराभव केला. नवी दिल्लीत हा सामना झाला.

//<><><><><>//